# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 3580/शि.वि./2017
दि./9/01/2017

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा,
म.न.पा., नागपूर

**विषय :– नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक – 2017**

**संदर्भ :– 1)सामान्य प्रशासन विभाग यांचे पत्र क्र.साप्रवि/46/परि दि.12.012.016**
**2) मा.राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रालिआ/मनपा–2017/प्र.क्र.2/का 5,दि.11.01.2017**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा.राज्य निवडणूक आयोगांचे दि.11.01.2017 संदर्भिय पत्रान्वये महानगरपालिकेचा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आल्याने, मा.अपर आयुक्त 3, म.न.पा. यांनी दिलेल्या निर्देशानुसार खालील सूचनांचे काटेकोर पालन करावे.

**अ)निवडणूक काळात अधिकारी/कर्मचाऱ्यांना दिर्घ मुदतीच्या रजा न देणेबाबत.**

नागपूर महानगरपालिकेची सर्वात्रिक निवडणूक दि.21 फेब्रूवारी 2017 (मंगळवार ) रोजी होणार असून निवडणूक प्रक्रीयेला सूरवात झालेली आहे. उपरोक्त निवडणूकीकरीता मोठया प्रमाणावर अधिकारी/कर्मचारी वर्ग लागण्याची शक्यता असल्यामुळे निवडणूक प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत निवडणूक अधिकारी यांचे परवानगी शिवाय आदर्श आचारसंहिता संपेपर्यंत आपले अधिनस्त कुठल्याही अधिकारी/कर्मचाऱ्यास/शिक्षकांस दिर्घ मुदतीची रजा देण्यात येवू नये.

**ब) निवडणूक आदर्श आचारसंहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे.**

मा.राज्य निवडणूक आयोगाचे संदर्भधिन पत्रानुसार नागपूर महानगरपालिकेची सार्वत्रिक दि.21 फेब्रूवारी 2017 (मंगळवार) रोजी घेण्यात येणार असल्यामुळे, राज्य निवडणूक आयोगाने पत्रात नमूद केल्याप्रमाणे सार्वत्रिक निवडणूकीची आदर्श आचारसंहिता नागपूर महानगरपालिका क्षेत्रात दि.11.01.2017 पासून लागू झालेली असून निवडणूक निकाल जाहीर होईपर्यंत दि.23.02.2017 (गुरूवार) पावेतो अस्तित्वात राहील.

या कालावधीत मतदारांवर प्रभाव पडेल असा कोणताही धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा असल्यास, राज्य निवडणूक आयोगाची परवानगी घेण्यात यावी. यामध्ये निवडणूकीसंबंधी अधिकारी/कर्मचारी यांच्या बदल्याचाही समावेश होतो.

(फारूक अहमद खान)
**शिक्षणाधिकारी,**
**महानगरपालिका, नागपूर.**

**प्रतिलिपी :–**
1) मा.उपायुक्त–1, म.न.पा., नागपूर यांना माहितीस्तव सादर